## प्रकाश सापळ्यामध्ये आकर्षित झालेले हुमणीचे भुंगे



हंगामात जमिनीत शेणखत टाकताना खताबरोबर हेक्टरी २५ किलो मेटारायझम किंवा बिव्हेरिया बुरशी मिसळून टाकावी.

* आडसाली ऊसाची लावण करतेवेळी शेणकाल्यातून मेटारायझम ॲनिसोफिली किंवा बिव्हेरिया बेस्सीयाना हि बुरशी टाकून लागवण करावी.

* जून महिन्यामध्ये ५० ग्रॅम १० लि. पाण्यात मिसळून त्यात थोडे अर्धा कप दूध टाकून पहारीने केलेल्या खड्ड्यात पहिली आळवणी करावी व १५-२० दिवसानंतर दुसरी आळवणी करावी. किंवा हेटेरोह्याबडीटीस इंडिका या परोपजीवी सुत्रकृमीची प्रति हेक्टरी ३ किलो ५०० लिटर पाणी या प्रमाणात पहारीने केलेल्या खड्ड्यात २०-३० दिवसाच्या अंतराने आळवणी करव्या.

नुकसानीचे स्वरुप लक्षात घेता, ऊभा ऊस किंवा खोडव्यामध्ये पहारीने ऊसाच्या बुंध्यालगत खड्डा काढून त्यात हुमणीचा प्रादुर्भाव दिसू लागताच फ्ल्युबेंडायअमाईड ३९.३५ टक्के २०० मिली., क्लोथियोनिडीन २५० ग्रॅम, क्लोरांट्रूनिलीप्रोल २०० मिली. मिश्र किटकनाशक फिलोप्रोनील ४० % + थायामिथोक्झाम ४०% १००० ग्रॅम किंवा क्लोरोपायरीफॉस १ लि. हेक्टरी ५०० लि. पाण्यात मिसळून पंपाचे नोझल काढून कच्च्या घातीवर पहारीने नाळे मारुन आळवणी करावी. वरील सर्व उपाय सामुहिकरित्या करणे गरजेचे आहे. किंवा फोरेट, १० जी किंवा फीप्रोनिल दाणेदार १० किलो समप्रमाणात मातीत मिसळून कच्च्या घातीवर टाकावे. नुसते सरीतून औषध टाकून हुमणीचा बंदोबस्त होणार नाही. कारण हुमणी बोधात आहे.

## बुरशीग्रस्त हुमणीचे अळी व पौढ भुंगे




प्रकाशक

**डॉ. रविंद्र सिंह**

वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

कृषि विज्ञान केंद्र, कोल्हापूर-II


* तांत्रिक माहिती स्त्रोत *

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

भा.कृ.अनु.प. - ऊस पैदास संस्थान, कोईमतुर (तामिळनाडू)

प्रकाशन वर्ष : जुन २०१९ | एकूण घडी पत्रिका क्र. ०२


# ऊसावरील हुमणी कीड व्यवस्थापन




लेखक व संकलन

**डॉ. पराग तुरखडे**

विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण)



भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली

श्री सिध्दगिरी

**कृषि विज्ञान केंद्र, कोल्हापूर-II**

कणेरी, ता. करवीर, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र) ४१६ २३४.

फोन नं.: ०२३१-२९८०००१

ई-मेल : kvkkolhapur2@gmail.com

### * हुमणी कीड व्यवस्थापन :

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये हुमणीकिडीचा प्रादुर्भाव मुख्यत: ऊस पिकावर दरवर्षी मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. महात्मा फुले कृषि विद्यापीठानुसार आपल्या भागात दोन प्रकारच्या हुमणी आढळतात. त्यात नदीकाठावरील हुमणी (लिकोफोलिस) आणि माळरानाची हुमणी (होलाट्राकीया) असे नामकरण केले आहे. तसेच महात्मा फुले कृषि विद्यापीठाने नवीन हुमणीची प्रजात शोधून काढली आहे. या हुमणीमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस, भुईमूग आणि भात इ. पिकामध्ये अतोनात नुकसान झाले आहे. या किडीच्या नियंत्रणासाठी तिचा जीवनक्रम, नुकसानाचे स्वरुप, किडीचा स्वभाव आणि व्यवस्थापनाचे उपाय माहिती असल्याशिवाय या हुमणीचा बंदोबस्त करणे शक्य नाही.

### * जीवनचक्र :

मुख्यत: वळवाचा (मार्च पासून मे पर्यंत) किंवा मान्सून पूर्व पाऊस (साधारणत: ६० ते ७० मी.मी.) पडला की हुमणीचे भुंगे (पौढ) जमिनीतून सायंकाळी ६.३० ते ८.३० दरम्यान बाहेर पडतात आणि जवळपासच्या कडूनिंब, बाभुळ इ. झाडावर जातात व पाने खातात.



तिथेच नर आणि मादीचे मिलन होते. मिलनानंतर नर लगेच मरतो आणि मादी जमिनीत अंडी घालण्यास सुरुवात करते. एक पौढमादी साधारणपणे ५० ते ६० अंडी घालते.

साधारणत: १५ ते १८ दिवसांनी अंडीतून नवजात अळी बाहेर पडते. हुमणीची ही अळी प्रथम सेंद्रिय पदार्थ खाते नंतर पिकाच्या मुळावर आक्रमण करते. ह्या अळीच्या तीन अवस्था आहेत. पहिली अवस्था ६० ते ९० दिवस, दुसरी अवस्थां ५५ ते ११० दिवस असते तर तिसरी अवस्था ४ ते ५ महिने असते. पूर्ण वाढ झालेली हुमणी अळी जमिनीत ७० से.मी. खोल, २० ते २२ दिवसांकरीता कोशावस्थेमध्ये

## जीवनक्रम




जाते. पाऊस पडल्यानंतर हे भुंगे बाहेर पडतात. साधारणपणे एक पिढी पूर्ण होण्यास एक वर्षाचा कालावधी लागतो.

### * नुकसानीचे प्रकार व स्वरुप :

हुमणीची नवजात अळी प्रथम सेंद्रिय पदार्थ खाते. अळी तिच्या दुसऱ्या अवस्थेपासून पिकाची मुळे खाण्यास सुरुवात करते आणि खोडाच्या जमिनीमधील भागात छिद्र करते परिणामी ऊसाची पाने पिवळे होऊन नंतर वाळतात. प्रादुर्भाव ग्रस्त झाड उपटल्यास सहज निघून येते. तसेच प्रादुर्भाव ग्रस्त झाडांचे वजन कमी होते व गुणवत्ता कमी झाल्यामुळे साखरेचा उतारा खालावतो. तर बेने लागवडीसाठी अयोग्य होतात. ही हुमणी उभा ऊस, भात भुईमूग, सोयाबिन अशा पिकांचे नुकसान करते.



### * प्रादुर्भावामध्ये वाढ होण्याची कारणे :

* वळवाचा किंवा मान्सूनचा जोराचा पाऊस पडल्यामुळे भुंग्याना कोषातून बाहेर पडण्यात पोषक वातावरण मिळते.

* एकपिक पध्दती, एकाच वाणाची दरवर्षी लागवड, वर्षभर खाद्य पिकाची उपलब्धता यामुळेसुध्दा या किडीचा प्रादुर्भाव वाढत आहे.

* अळी अवर्षण काळात सुध्दा तीन महिन्यापर्यंत जमिनीमध्ये सुप्त अवस्थेमध्ये राहू शकते.

### * व्यवस्थापनासाठी उपाययोजना :

* नुकसान ग्रस्त भागात वळवाच्या पावसाआधी (फेब्रुवारी महिन्यात) शेताची खोल नांगरणी करुन अळ्या वेचून त्याचा नाश करावा.

* वळवाचा पाऊस (मार्च पासून मे पर्यंत) किंवा मान्सूनचा पाऊस पडल्यानंतर हुमणीचे भुंगे सायंकाळी एकाचवेळी बाहेर पडतात आणि बाभूळ, कडूनिंब झाडावर जमा होतात. ते काडीच्या सहाय्याने फांद्या हलवून गोळा भुंगे करुन रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत.

* सायंकाळी शेतात प्रकाश सापळा लावू भुंगे आकर्षित करावे.

* एरंड आंबवण सापळ्याचा वापर करुन भुंगे आकर्षित करणे (एरंडीच्या बिया २ किलो + २५ ग्रॅम यीस्ट + ५० ग्रॅम बेसन पीठ + २ लिटर पाणी)

* अळी सुरुवातीला सेंद्रिय पदार्थावर जगते तेव्हा खरीप